पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/४/कावि/२३० /२०२१
दिनांक : ०७/०५/२०२१

प्रति,

मा......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दि.**१४/०५/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक १४/०५/२०२१ रोजी दु.२.३० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ११**

**दिनांक : १४/०५/२०२१** **वेळ : दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक १४/०५/२०२१ रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात ऑनलाईन पध्दतीने (VIDEO CONFERENCING) द्वारे आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बालकल्याण योजने अंतर्गत शहरातील महिलांच्या विकासासाठी, सक्षमीकरणासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. महिलांना स्वयंरोजगार करता यावा, त्यादृष्टीने त्या सक्षम व्हाव्यात यासाठी महिलांना विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते.  कोविड १९ च्या कलावधीत लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाली आणि या काळात मोलमजुरी करणारे, घरगुती काम करणारे या घटकाची आर्थिक स्थिती खालावली. तसेच लॉकडाऊन नंतर सुध्दा या घरगुती कामगारांना अनेक सोसायट्यांमध्ये कामासाठी येऊ देत नव्हते अशा परिस्थितीत महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत कोविड १९ प्रशिक्षित मोलकरीन या प्रशिक्षणाच्या माध्यमातून एकुण २६१६ घरगुती काम करणा-या मोलकरींना दहा दिवसांचे मोफत प्रशिक्षण देणेत आले. त्यामुळे लॉकडाऊन कालावधी संपलेनंरच्या काळात या प्रशिक्षित महिलांना पुन्हा कामावर घेतले गेले तसेच कोविड १९ संवेदनशिलता आणि जागरुकता हे प्रशिक्षण एकुण ५८५३९ महिलांना देण्यात आले. तसेच वृध्दांसाठी स्थानिक कोविड १९ स्वयंसेवक हे प्रशिक्षण एकुण १४७१४ महिलांना देणेत आले. या सर्व प्रशिक्षणाचा लाभ पुर्ण वेळ, अर्धवेळ घरगुती काम करणा-या महिला, लहान मुलांची, वृध्दांची शुश्रृषा करणाऱ्या महिला, सवयंपाक करणा-या महिला, साफसफाई करणा-या महिला या घटकांना लाभ मिळाला आहे. या सर्व कामाची दखल घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील घरगुती काम करणा-या महिला कामगारांना सक्षम बनविण्याच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रयत्नांना बळकटी देणेसाठी UN WOMEN ही संस्था पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि DWSSC या दोन संस्था समवेत एकत्र काम करणाच्या उद्देशाने सामंजस्य करार करु इच्छित आहे. UN WOMEN ही संस्था लैंगिक समानता आणि स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी संयुक्त राष्ट्र संघाची एक सहाय्यक संस्था म्हणुन कार्यरत आहे. ही संस्था

महिला लैंगिक समानता आणि स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने काम करीत आहे. DWSSC ही संस्था NSDC ने स्थापन केलेली घरगुती कामगार क्षेत्र कौशल्य परिषद या नावाने ओळखली जाते. या संस्थेचे उद्दिष्ट भारतातील घरगुती कामगारांच्या कौशल्याच्या विकासासाठी राष्ट्रीय संस्थात्मक नेटवर्क प्रस्तापित करणे, घरगुती कामगारांसाठी व्यवसायासाठी मापदंड निश्चित करणे, घरगुती कामगारांचे प्रमाणीकरण, मुल्यांकन करुन प्रमाणपत्र देऊन त्यांना प्रमाणित दर्जा प्राप्त करुन देणे हे उद्दिष्ट आहे. UN WOMEN या संस्थेने सामंजस्य कराराचा (MOU) मसुदा पाठविला असून त्याचे अवलोकन होणेस विनंती.

**या करारनाम्यात खालील मुद्यांचा समावेश आहे.**

१) कौशल्य प्रशिक्षण व कौशल्य वाढ कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड शहरातील व सध्या काम करीत असलेल्या महिला घरेलू कामगारांचे एकत्रीकरण करणे.

२) घरेलु कामगारांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांची तयारी करणे यामध्ये कोविड नंतरच्या परिस्थितीमध्ये काम कसे करावे, आर्थिक साक्षरता कार्यक्रम, स्पोकन इंग्लिश / संभाषण कौशल्ये, लैगिक आरोग्य (Reproductive and sexual health) कामाच्या ठिकाणी लैगिक छळ प्रतिबंध (Posh – Prevention of sexual harassment at workplace) आणि महिलांवरील हिंसाचार निर्मुलन (EVAM – Elimination of violence against women) इत्यादी.

३) लिंग समानता प्रशिक्षण कार्यक्रम अभ्यासक्रम तयार करणे आणि घरगुती महिला कामगारांना कौशल्य प्रशिक्षण देणे.

४) DWSSCही संस्था आणि NSDCयांचे संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड शहरातील घरगुती कामगारांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

५) घरगुती कामगारांच्या सुरक्षा आणि सबलीकरणावर जागरुकता आणि सल्ला देणे.

६) घरेलु महिला कामगारांसाठी कौशल्य आणि रोजगार या संकल्पनेला बळकटी देऊन DWSSCआणि UN WOMENयांना हा संकल्प देशभर राबविता येईल.

**या करारनाम्याचे सामान्य उद्दिष्ट खालीलप्रमाणे असेल : -**

पिंपरी चिंचवड शहरातील घरेलु महिला कामगारांना कौशल्य आणि रोजगाराच्या प्रवेशास मदत करणे हे आहे आणि त्याद्वारे घरेलु कामगारांना गरिबीतुन मुक्त करणे, कामाच्या ठिकाणी होणारा छळ व शोषण दूर करणे आणि घरकामगारांना प्रमाणित कुशल कामगार दर्जा प्रदान करणे हे आहे.

**करारनाम्यातील पक्षकारांची भुमिका –**

पिंपरी चिंचवड मनपा – या कामाचा वस्तीपातळीवरील प्रसार, प्रचार आणि प्रशिक्षण यासाठी आवश्यक सर्व मदत प्रदान करेल.

डी.डब्ल्यु एस.एस.सी. – मान्यता, मुल्यांकन आणि प्रमाणपत्र यासाठी आवश्यक सर्व मदत प्रदान करेल.

यु.एन. वुमन – ज्ञान भागीदाराची भुमिका निभावतील.

हे तीन पक्ष एकत्रीतपणे काम करुन कामगार दलातील सर्वात दुर्लक्षीत गटांपैकी एक असणा-या घरेलु महिला कामगारांच्या सशक्तीकरण आणि लिंग समानता, सबलीकृत, शोषणमुक्त आणि आत्मनिर्भर राहणाच्या दृष्टीने एक नाविन्यपुर्ण मॉडेलची रचना करुन त्याची अंमलबजावणी करतील. या उपक्रमासाठी आवश्यक असणा-या खर्चाची तरतुद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील पंडित दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या लेखाशिर्षातून करता येईल. तरी या उपक्रमाची अंमलबजावणी करणे त्यासाठी करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२३०/२०२१
दिनांक : ०७/०५/२०२१ चे लगत.

टिप – प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेले आहे.